Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१५ एप्रिल, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# दुर्गापुर पोलीसांची विशेष कार्यवाही

## ➢ बॅटरी चोरी करणारे आरोपी २४ तासात जेरबंद

## ➢ तिन आरोपीसह ८ नग बॅटरी हस्तगत

दिनांक १३/०४/२०१९ रोजी फिर्यादी नामे नथ्थुजी भदुजी गुंजेकर वय ५७ रा. डब्लुसीएल, शास्त्रीनगर कॉलनी चंद्रपुर यांनी पोलीस स्टेशन दुर्गापुर येथे रिपोर्ट दिली की, कोणीतरी अज्ञात इसमांनी डब्लुसीएल दुर्गापुर परिसरात असलेल्या गोदामधील Exide Powersafe Plus कपंनीच्या १२ वॅटच्या ८ नग बॅटरी किं. ४०,०००/—रू चा माल चोरून नेला. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दुर्गापुर येथे अप.क्र. १०९/२०१९ कलम ४६१, ३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा नोंद होताच वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शनात तपासास सुरवात झाली. तपासादरम्यान गोपनीय माहिती वरून अवघ्या काही तासातच संशयावरून दुर्गापुर परिसरातील ३ इसमास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांच्या ताब्यात चोरी केलेल्या Exide Powersafe Plus कपंनीच्या ८ नग बॅटरी किं. ४०,०००/—रू चा माल मिळुन आला. यावरून तिन्ही आरोपी नामे १) अय्युब शेख युसुफ शेख वय ३० रा. दुर्गापुर कोंढी वार्ड क्र. ०५ चंद्रपुर, २) कैलास बाजीराव बावनथडे वय ३६ रा. समतानगर वार्ड क्र. ०६ उर्जानगर चंद्रपुर, ३) देवेंद्र महादेव गेडाम वय १९ रा. दुर्गापुर वार्ड क्र. ४ चंद्रपुर यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेडड्ी चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात, पोलीस स्टेशन दुर्गापुर पोनि. श्री. दिपक खोब्रागडे यांचे नेतृत्वात पोउपनि. गणेश झांबरे, पोहवा. सुनिल गौरकर, अशोक मंजुळकर, रजनिकांत पुठ्ठावार, नापोशि उमेश वाघमारे, सुनिल मैश्राम, पोशि संतोष आडे यांनी पार पाडली.

———————————————————————————————

# हुंडयाच्या मागणीवरून स्वत:च्या पत्नीस जाळुन मारणाऱ्या आरोपीस कोर्टाने सुनाविली शिक्षा

पोलीस स्टेशन सिंदेवाही अंतर्गत हुंडयाच्या मागणीने शारीरीक आणि मानसिक त्रास देवुन स्वत:च्या पत्नीस जाळुन मारणाऱ्या आरोपीस १५/०४/२०१९ रोजी **श्री. एसी. डी. दिग्रसकर, प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा सत्र न्यायाधीश चंद्रपुर यांनी ७ वर्ष कारावासाची शिक्षा ठोठावली.**

पोलीस स्टेशन सिंदेवाही अंतर्गत यातील फिर्यादीच्या मुलीचे दिनांक २६/०३/२००९ रोजी आरोपी नामे गजानन सुर्यवंशी यांचे सोबत लग्न झालेले होते. लग्नानंतर ती आपल्या पतीसोबत राहत असतांना आरोपी पती नामे **गजानन दत्तात्रेय सुर्यवंशी वय ४२ वर्ष, रा. आंबोडा, ता. महागाव, जिल्हा यवतमाळ, याने** आपल्या पत्नीला वांरवार माहेरून पैसे आणण्यासाठी शारीरीक आणि माणसिक त्रास देत होता. यातच ऐकेदिवशी आरोपीने त्याच्या पत्नीला तिच्या माहेरकडुन ५ लक्ष रूपयाची मागणी करावयास सांगीतले परंतु तिने त्यास नकार दिल्याने रागाच्या भरात आरोपीने तिला मारहाण करून तिचा अंगावर मातीचे तेल ओतुन तिला जाळुन मारले. अशा फिर्यादीच्या व मेडिकल रिपोर्टवरून पोलीस स्टेशन सिंदेवाही येथे आरोपीविरूध्द अप.क्र. ११/२००९ कलम ४९८(अ), ३०४(ब) भादंवि सहकलम ४ हुंडा प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरिक्षक श्री. एम.जी. पठाण, पोस्टे सिंदेवाही यांनी पुर्ण करून आरोपी विरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १५/०४/२०१९ रोजी **गजानन दत्तात्रेय सुर्यवंशी वय ४२ वर्ष, रा. आंबोडा, ता. महागाव, जिल्हा यवतमाळ, यास कलम ३०४(ब) भादंवि अन्वये गुन्हा सिध्द झाल्याने ७ वर्ष कारावास व ५,०००/—रू आर्थिक दंड व दंड न भरल्यास ६ महिने कारावासाची शिक्षा श्री. एसी. डी. दिग्रसकर, प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा सत्र न्यायाधीश चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणात सरकार तर्फे **ॲड. पी. जी. घट्टुवार, सरकारी अभियोक्ता, तर कोर्ट पैरवी म्हणुन सफौ. रमेश मुक्कावार, पोस्टे सिंदेवाही** यांनी काम पाहिले.

———————————————————————————

चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
१५ एप्रिल, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची कोंबडा बाजारावर धाड

## ८ आरोपी व २९ दुचाकीसह ८ लक्ष ९७ हजाराचा मुद्देमाल हस्तगत

दि. १४/०४/१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेस गोपनीय माहिती मिळाली की, मौजा हळदी गावाजवळील अंधारी नदी जवळ काही इसम हे कोंबडयाचा झुंजीवर पैशाची बाजी लावुन जुगारचा खेळ खेळत आहेत, अशा माहीतीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी सापळा रचुन छापा मारला असता अंधारी नदीकाठावर काही इसम कोंबडयाच्या झुंजीवर पैश्याची बाजी लावून जुगारचा खेळ खेळतांना दिसुन आले. त्यामध्ये ८ ईसम हे दोन कोबंडयाच्या पायाला काती बांधुन झुंज लावत असता रंगेहात मिळून आले व उर्वरीत काही ईसम हे पोलीसांना पाहुन हळदी गावाजवळील जंगलात पळुन गेले. पोलीस पथकाने छापा टाकलेल्या परिसरातील झडती घेतली असता घटनास्थळावर ३ जिवंत कोंबडे व २ मृत कोंबडे आणि एकुण २९ दुचाकी गाडया व मोबाईल असा एकुण ८,९७,३४०/—रू चा मुददेमाल मिळुन आला.

घटनास्थळावरून ताब्यात घेण्यात आलेल्या व पळुन गेलेल्या आरोपींचे कृत्य हे कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा होत असल्याने त्यांचेविरूद्ध पोलीस स्टेशन रामनगर येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही. पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेडड्ी, चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी पोनि. श्री. ओ. जी. कोकाटे यांचे नेतृत्वात पोउपनी. मुटेकर, पोउपनी. वैरागडे, सफौ. पंडीत वराडे, विजय संगीडवार, पोहवा. बोरकर, नापोशि. अमजद, अविनाश, चंदु नागरे, जमीर, अनुप, मनोज रामटेके, पोशि. अमोल धंदरे, प्रफुल मेश्राम, विनोद जाधव, चालक ढाकणे यांनी पार पाडली.

---